POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

गणपती बाप्पा मोरया

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२६ ● मुंबई, बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## बाप्पाच्या स्वागताला वरुणराजाचे आगमन !

## या ठिकाणी यलो अलर्ट जारी

**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय झाल्यामुळे हवामान विभागाने राज्यातील काही भागांमध्ये पुढील २४ तासांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत घेतलेल्या आढाव्यानंतर ही सूचना दिली आहे.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाटमाथा, सातारा घाट, नंदुरबार, धुळे, जळगाव, नांदेड, हिंगोली, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांत पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.


या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने NDRF (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल) व SDRF (राज्य आपत्ती प्रतिसाद दल) यांना अलर्टवर ठेवले आहे. सध्या राज्यात १८ NDRF पथके आणि ६ SDRF पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत. मुंबईत २ NDRF पथके नेहमीसाठी तैनात असून, आणखी ३ पथके मान्सूनसाठी सज्ज आहेत. याशिवाय पालघर, रायगड, ठाणे, रत्नागिरी, कराड, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, नागपूर आणि पुणे येथेही पथके तैनात आहेत. SDRF चे पथक नागपूर, गडचिरोली, धुळे आणि नांदेड येथे सक्रिय आहेत.

गेल्या २४ तासांत सर्वाधिक पावसाची नोंद रायगड जिल्ह्यात ३४. ७ मिमी झाली आहे. त्यानंतर पालघरमध्ये ३०. ३० मिमी, ठाण्यात ३० मिमी, नंदुरबारमध्ये २७. १ मिमी आणि रत्न ागिरीत १७. ५ मिमी पाऊस झाला आहे.

मुंबई उपनगरात या पावसामुळे भिंत कोसळल्याची घटना घडली असून, एक व्यक्ती जखमी झाला आहे. आपत्कालीन स्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाचा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहे. हवामान विभाग (IMD) आणि राष्ट्रीय अंतराळ संशोधन संस्था (NRSC) यांच्याकडून सतत माहिती घेतली जात असून, ती संबंधित जिल्ह्यांना पाठवली जात आहे.





## लालबागचा राजा मंडपात बसवले २५० पेक्षा जास्त CCTV कॅमेरे, अकची पण मदत घेणार



**■मुंबई । प्रतिनिधी,**

गणेशोत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी मुंबईतील 'लालबागचा राजा' मंडळाने मंडपात कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली आहे. 'लालबागचा राजा' मंडळाच्या मंडपात २५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. संरक्षण व्यवस्था आणखी मजबूत करण्यासाठी अकअर्थात कृत्रिम प्रज्ञेचीही मदत घेतली जाणार आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील 'लालबागचा राजा' मंडळाच्या मंडपात दररोज लाखो भाविकांची गर्दी असते. दर्शनासाठी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचीही संख्या मोठी असते. मागच्या वर्षी यूट्युबर ज्योती मल्होत्राने 'लालबागचा राजा'च्या परिसरात चित्रीकरण केले होते. आता ज्योतीला पकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेला मदत केल्याच्या आरोपात अटक करण्यात आली आहे. त्यामुळे यंदा सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही त्रुटी न ठेवण्याचा निर्धार लालबागचा राजा सार्वजनिक मंडळाने केला आहे. पोलिसांच्या सुरक्षा उपाययोजनांसोबतच मंडळाने एआय सारख्या तंत्रज्ञानाच्या मदतीने सुरक्षा कवच उभे केले आहे. 'लालबागचा राजा' मंडळाच्या मंडपात फेस डिटेक्ट करणारे तसेच आयबॉल डिटेक्ट करणारे कॅमेरे बसवले आहेत. यामुळे मंडळाची संरक्षण व्यवस्था आणखी मजबूत झाली आहे. संशयास्पद असे काहीही आढळल्यास लगेच सुरक्षा यंत्रणेला माहिती मिळेल. सुरक्षा यंत्रणा सावध होऊन तातडीने उपाय करेल, अशी चोख यंत्रणा उभारण्यात आली आहे. मंडपातील निषिद्ध भागात घुसखोरीचा प्रयत्न होऊ नये यासाठी तिथे मोशन ट्रॅकिंग अलर्ट सिस्टिम बसवली आहे. मंडळाने मुंबई पोलिसांच्या सोबत साडेतीन हजार कार्यकर्त्यांची फौज सज्ज ठेवली आहे. हे कार्यकर्ते मंडळात चोख बंदोबस्त ठेवण्यास पोलिसांना सहकार्य करणार आहेत.

## बापरे ... कोकणवासीयांचे हाल सुरूच; मुंबई गोवा महामार्ग म्हणजे हॉरिबल



**कोकण रेल्वेचा लेट मार्क**

01109– एलटीटी ते सावंतवाडी : 5 तास

01445 – पुणे ते रत्नागिरी : 4 तास

01165– एलटीटी ते मडगाव : तीन तास

10103– मांडवी एक्सप्रेस : दीड तास

01151– सीएसएमटी ते सावंतवाडी : दीड तास

00148 – सीएसएमटी ते सावंतवाडी : 1 तास

01155– दिवा ते चिपळून : 1 तास

01171– एलटीटी ते सावंतवाडी : 1 तास

12051– जनशताब्दी : 50 मिनिटे

**■मुंबई । प्रतिनिधी,**


गणपती उत्सवासाठी कोकणात जाणे म्हणजे कोकणवासीयांसाठी दिव्य असते. कितीही काही केले तरी कोकणवासीयांचे प्रवासाचे हाल संपतच नाहीत. यंदाची याचीच प्रचिती सर्वांना येत आहे. कोकणवासीयांसाठी कोकण रेल्वेने विशेष गाड्या सोडल्या आहेत. मात्र, या गाड्या उशिराने धावत आहेत. त्यामुळे सोय कमी गैरसोयच जास्त होत आहे. तर दुसरीकडे मुंबई-गोवा महामार्गावरून कोकणात जाणाऱ्याचे नेहमीप्रमाणे यंदाही कंबरडे मोडले आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामागार्चे रुंदीकरण कधी पूर्ण होणार, याकडे कोकणवासीयांचे लक्ष लागले आहे.

गणपती उत्सवाला अवघे काही तास उरले आहेत. मात्र, कोकणात सोडलेल्या ट्रेन एक ते पाच तास उशिराने धावत आहेत. त्यामुळे कोकणवासीयांचे वेळापत्रक बिघडले आहे. ट्रेन उशिराने धावत असल्यामुळे गाड्यांना गर्दी झाली आहे. तसेच पुढे एसटीने प्रवास करतानाही प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागत आहे. कोकणवासीयांसाठी ट्रेन, एसटीची सुविधा असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात अपुऱ्या गाड्यांमुळे एसटी डेपोंमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी होत आहे. या बद्दल प्रवासांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई-गोवा महामागार्चे विघ्न मुंबई-गोवा महामागार्ची वाताहत पाहिल्यानंतर कुणीही या महामार्गावरून प्रवास करण्याचे धाडस करणार नाही. मात्र, पर्याय नसल्याने महामार्गावरील खड्ड्यांतून मार्ग काढत कोकणवासीय या महामार्गावरून प्रवास करत आहेत. मात्र, त्यांना इंदापूर, माणगावजवळ मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. तसेच बंदी असूनही अवजड वाहने या महामार्गावरून धावत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे.

### मुंबईत 'बेस्ट' हजारांत, खासगी वाहने अर्धकोटी; वाहतुकीचा बट्ट्याबोळ

**मुंबई** : मुंबईतील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, ती आता तब्बल 50 लाखांवर पोहोचली आहे. मुंबई पालिकेच्या पर्यावरण स्थिती अहवाल 2024-25 नुसार, या वाहनांमध्ये दुपहिया आणि कार-जीप यांचा सर्वाधिक वाटा असून, शहरातील सुमारे 88 टक्के रस्ते खासगी वाहनांनी व्यापले आहेत. याउलट, सार्वजनिक वाहतुकीतील इएरळ गाड्यांचे मार्ग एक टक्क्यापेक्षाही कमी आहेत यामुळे ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. मुंबई शहरात सर्वाधिक वाहनं पेट्रोलवर चालत असून, त्यांची संख्या सुमारे 39.86 लाख इतकी आहे. त्यानंतर डिझेलवर चालणारी वाहनं 5.63 लाख इतक्या प्रमाणात आहेत. तर सीएनजीवर चालणाऱ्या गाड्यांची संख्या 4.36 लाख इतकी आहे. मात्र, केंद्र सरकार आणि राज्य सरकार चालना देत असणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांची संख्या कमी प्रमाणात दिसून येत आहे. प्रदूषणावर मात करण्यासाठी सरकार चालना देत आहे, मात्र मुंबई शहरात सध्यच्या घडीला फक्त 48,854 इलेक्ट्रिक वाहनांची नोंद आहे, जी पेट्रोल आणि डिझेल वाहनांच्या संख्येच्या तुलनेत फारच नगण्य आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीचा प्रचार होऊनही नागरिकांचा कल अजूनही पारंपरिक इंधनांकडेच अधिक आहे, अशी माहिती समोर येत आहे. एप्रिल 2024 ते मार्च 2025 या कालावधीत जवळपास 2.94 लाख नव्या वाहनांची नोंदणी झाली असून, त्यातील बहुतांश वाहने दोनचाकी असून त्यापाठोपाठ कार आणि जीपसारख्या चार चाकी वाहणांचा क्रम लागतो.

## वैष्णोदेवी यात्रा मार्गावर भूस्खलन; पाच जणांचा मृत्यू तर अनेक जखमी



**■नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

जम्मू आणि काश्मीरच्या दोडा जिल्ह्यात मुसळधार पाऊस, ढगफुटी आणि भूस्खलनामुळे पाच जणांचा मृत्यू झाला असून 14 जण जखमी झाले आहेत. तर काही जण गाडले गेल्याची भीती आहे. त्यामुळे भूस्खलनानंतर मोठ्या प्रमाणात मदत आणि बचाव कार्य केले जात आहे. रियासी पोलीस-प्रशासन आणि एनडीआरएफ सतर्क आहेत. श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाने ट्वीट करत भूस्खलनाची माहिती दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोडा जिल्ह्यात कटरा येथे मुसळधार पावसामुळे दुपारी 3 च्या सुमारास माता वैष्णोदेवी यात्रा मार्गावरील अर्धकुंवारी येथे असलेल्या इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ भूस्खलन झाले. वैष्णोदेवी मंदिराकडे जाणाऱ्या 12 किमी वळणाच्या मार्गावर ही दुर्घटना घडली आहे. भूस्खलनामुळे घर कोसळून दोघांचा तर पुरामुळे तिघांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय 14 जण जखमी आहेत. तसेच भूस्खलनामुळे या भागातील अनेक घरे आणि रस्ते उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे त्याठिकाणी काही जण गाडले जाण्याची भीती आहे. याशिवाय प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी नदीकाठच्या रहिवाशांना तिथून दूर जाण्याचे आवाहन केले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हिमकोटी ट्रेक मार्गावरील भाविकांचा प्रवास सकाळपासून थांबवण्यात आला होता.

तर दुपारी 1.30 वाजेपर्यंत जुन्या मार्गावरून भाविकांचा प्रवास सुरू होता. परंतु मुसळधार पावसामुळे पुढील आदेश येईपर्यंत आम्ही जुन्या मार्गावरूनही भाविकांचा प्रवास थांबवला आहे. त्यामुळे आता भूस्खलनामुळे माता वैष्णोदेवीची यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. खराब हवामानामुळे शाळांना सुट्टी जाहीर खराब हवामानामुळे विविध सुरक्षा दलांमध्ये कॉन्स्टेबल पदासाठी सुरू असलेली भरती प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाने जम्मू विभागातील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा 27 ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. याशिवाय जम्मू आणि काश्मीर शालेय शिक्षण मंडळाने बुधवारी होणाऱ्या दहावी आणि अकरावीच्या परीक्षाही पुढे ढकलण्याची घोषणा केली आहे. बीएसएफने माहिती दिली की, जम्मूच्या पलौरा कॅम्प येथे होणारी कॉन्स्टेबल (जीडी) भरती परीक्षा खराब हवामानामुळे पुढे ढकलण्यात आली आहे आणि आज बोलावलेले उमेदवार आता 3 सप्टेंबर रोजी परीक्षा देऊ शकतील. जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक बंद दरम्यान, रामबन जिल्ह्यातील चंदरकोट, केला मोड आणि बॅटरी चष्मा येथे टेकड्यांवरून दगड कोसळल्यानंतर आज सकाळी खबरदारीचा उपाय म्हणून 250 किमी लांबीच्या जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. भारताला देशाच्या इतर भागाशी जोडणाऱ्या एकमेव सर्व हवामान महामार्गावरील वाहनांची वाहतूक जम्मूमधील उधमपूर आणि काश्मीरमधील काझीगुंड येथे थांबवण्यात आली आहे. लष्कर गादीगड परिसरातून लोकांना सतत वाचवत आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## गणरायाकडे इतकेच मागणे

अतिवृष्टी, निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनांमुळे राज्याच्या तिजोरीवर पडलेल्या ताणामुळे रखडलेली विकासकामे, स्थानिक स्वराज्य संस्थांची हालाखीची स्थिती, अनुदानांची प्रतीक्षा, शेतकर्‍यांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी, महिलांची असुरक्षितता, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान अशा कित्येक समस्या महाराष्ट्रासमोर आहेत. ही विघ्ने दूर करण्याची बुद्धी बाप्पांनी महाराष्ट्रातील नेत्यांना, सत्ताधार्‍यांना आणि राजकारण्यांना द्यावी, ही अपेक्षा जरी अतीच आहे, मात्र ही विघ्ने समोर असताना बुद्धिदात्या गणपती बाप्पांनी महाराष्ट्रातील राजकारण्यांनी आपले राजकीय वर्तन सुधारण्याची किंबहुना आपली वक्तव्ये नियंत्रणात ठेवण्याची बुद्धी द्यायला हरकत नाही. मात्र अशा बुद्धीचा स्वीकार राजकारण्यांकडून केला जाईलच याची खात्री नाही, राजकारणाचा संबंध निस्पृह बुद्धी आणि विवेकाशी नसून मुत्सद्दीपणाशी आणि डावपेचाशी असतो. आक्षेपार्ह, असंबंध बोलणे हा आजच्या राजकारणात अवगुण नाही तर ती राजकारणाची गरज बनली आहे. त्यामुळे बुद्धिवंत, समंजस साधीसरळ माणसे राजकारणापासून चार हात लांबच राहाणे पसंत करतात. मात्र त्यांच्या अशा उदासीन आणि राजकीय अनुपस्थितीचा गैरफायदा राजकारण्यांकडून घेतला जातो.

धार्मिक, राजकीय आणि सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये राजकारणी जाणीवपूर्वक करतात, राजकारणी गुन्हेगारांना पाठीशी घालतात, एवढेच नव्हे तर अनेकदा स्वतःच्या लोकप्रतिनिधीपदाच्या अहंकारातून कमकुवत माणसांना कॅमेर्‍यासमोर मारझोड करतात, या अशा वागण्याचे समर्थन करतात. सभागृहांचे अधिवेशन सुरू असताना धार्मिक, भावनिक गैरलागू मुद्दे समोर आणून महत्त्वाच्या प्रश्नांना बगल देणे, राजकारणाकडून जाणीवपूर्वक केला जाणारा हा नेहमीचाच प्रकार आता लोकांच्या अंगवळणी पडला आहे. त्यामुळेच अतिवृष्टीमुळे लोकांची उडालेली दैना, रस्त्यांचे पडलेले खड्डे, रखडलेल्या विकासकामांमुळे निर्माण झालेल्या इतर समस्या याविषयी आता कोणालाही काहीही वाटत नाही.

हे असेच असते, असेच सुरू राहाणार अशी निराशेची समजूत प्रत्येकाने करून घेतली आहे. निगरगट्ट राजकारण्यांच्या हे पथ्यावर पडत आले आहे. राजकीय वर्तनात पारदर्शकता, जबाबदारी आणि जनतेच्या हिताला प्राधान्य देणे हा आदर्शवाद कित्येक मैल मागे पडला आहे. भ्रष्टाचार, गटबाजीमुळे राज्याचे राजकारण रसातळाला गेले आहे. राजकारणी आता जनतेशी संवाद करत नाहीत तर त्यांना थेट धमकावतात, वेळप्रसंगी मारझोडही करतात. आपल्या चुकांचे लंगडे समर्थनही करतात. चांगल्या कामासाठी प्रसंगी पक्षभेद बाजूला सारून एकत्र येण्याची महाराष्ट्राची राजकीय परंपराही मागे पडली आहे. अविश्वास, भीती, कुरघोडीला राजकारणात ऊत आला आहे.

जरी बहुमताची सत्ता असली तरी मागील पाच वर्षात राज्यातील राजकीय अस्थिरता दिसून आलेली आहे, यामागे सत्तेच्या वळचणीला जाण्याची हतबलता महाराष्ट्रातल्या राजकारण्यांची अपरिहार्यता ठरली आहे. जातीय, धार्मिक समूहांच्या विघटीत राजकारणांमुळे महाराष्ट्राच्या ऐक्याचे तीन तेरा झाले आहेत. दुसरीकडे भ्रष्टाचाराचे आरोप, विशेषतः पायाभूत सुविधा प्रकल्प, जमीन व्यवहार आणि सरकारी निविदांमध्ये गैरप्रकार झाल्याचे आरोप आहेतच. माहितीच्या अधिकाराची गळचेपी, माध्यमांवरील दबाव, पारदर्शकतेचा अभाव, स्वायत्त यंत्रणांनी सत्तेचे पत्करलेले मांडलिकत्व यामुळे लोकशाहीवर प्रेम असलेला सामान्य माणूस पुरता निराश झाला आहे.

सामाजिक मुद्द्यांवरही राज्यातील स्थिती खूप काही चांगली नाही. महाराष्ट्राच्या विधानसभेत महिला आमदारांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ज्या महिला प्रतिनिधी आहेत त्यांनाही पक्षादेशापलीकडे स्वतःचे लोकप्रतिनिधी म्हणून स्वतंत्र अस्तित्व नाही. आरक्षणासाठी लढणारे सामाजिक गट, आदिवासी, वंचित, पीडितांचे आर्थिक मागासलेपण, सामाजिक भेदभाव, विषमतेचे प्रश्न कित्येक वर्षांपासून कायम आहेत. हे प्रश्न राजकीय हत्यार म्हणूनच वापरले गेल्याचा महाराष्ट्राचा इतिहास आहे. त्याला सध्याचे बहुमतातील सरकारही अपवाद नाही. राज्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर न मिळालेला न्याय, या निराशेत भर घालणारा आहे.

शेतकरी आत्महत्या, पाणीटंचाई, पायाभूत सुविधांचा प्रश्न कायम आहे. कापसाच्या किमती, हमीभाव, शेतकर्‍यांवरील वाढते कर्ज, शिक्षण, रोजगाराच्या अपुर्‍या संधी, साधने, कौशल्यांना पुरेशी संधी न मिळाल्यामुळे तरुण निराश आहेत. जातीय, धार्मिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणासाठीचे तणावपूर्ण राजकारण, निवडणूक प्रक्रियेवर होणार्‍या आरोपामुळे मतांची घसरणारी टक्केवारी आदी अनेक प्रश्न राज्यासमोर आहेत. सामाजिक संघटनांवर सत्तेच्या दबावामुळे लोकशाहीची ताकद असलेल्या सामाजिक चळवळी संपुष्टात येत आहेत. राजकारणाचे गुन्हेगारीकरण की गुन्हेगारीचे राजकारण असा प्रश्न पडावा इतकी स्थिती बिकट झाली आहे.

गुन्हेगारांना सत्तेकडून मिळणारे अभय आणि गुन्हेगारीला सत्तेकडून पाठीशी घातले जाण्याच्या प्रकारांमुळे ही स्थिती आणखी गंभीर झाली आहे. सुरक्षा आणि तपास यंत्रणांवरील राजकीय दबावामुळे लोकांच्या विश्वासाला तडा जात आहे. राजकीय नेत्यांकडून कायद्याचे राजकीय खेळणे झाल्यासारखी स्थिती आहे. न्यायाच्या तत्वावरील उडालेला विश्वास लोकशाहीवरील उडालेला विश्वास आहे. सूज आल्यासारखी शहरांची स्थिती असताना ग्रामीण भागातूनही विकासाच्या नावाखाली भूमिपुत्रांचे स्थलांतर होत आहे. अशा परिस्थितीत राज्यात पालिकांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. निवडणुकांच्या उत्सवाचे रुपांतर राजकीय उन्मादात होऊ नये, एवढेच साकडे श्रीगणेशापुढे घातले जाऊ शकते. उद्या आगमन होणार्‍या बाप्पांनी सामान्यांचे एवढेच गार्‍हाणे ऐकावे आणि त्यांना समस्यांतून दिलासा द्यावा.

## तू सकलमतिप्रकाशु!

या विश्वाचा कणन कण ज्ञानस्वरूप परमात्म्याने जर व्यापला असेल तर अविद्येला या जगात जागाच उरत नाही. हा विषय पटवून देताना शास्त्रकार म्हणतात, सूर्याच्या राज्यात अंधारालाही जागा नव्हतीच! जो होता तो प्रकाशाचा संतांनी वर्णन केलेला श्रीगणेश म्हणजे, या सृष्टीचं आदिबीज. या विश्वाची उत्पत्ती, स्थिती, आणि लय याचं महाकारण! विश्वाच्या निर्मितीपूर्वी असलेलं ब्रह्म तेच, या वर्तमान क्षणाला धारण करणारं तत्त्व तेच, आणि भविष्यात या विश्वाच्या अंतानंतर उरेल असं स्वरूपही तेच. केवळ ज्ञानाशी ज्याची तुलना करता येऊ शकते असं अनादि... अनंत... ज्ञानस्वरूप! या आदितत्त्वाला समर्थांनी गणपतीच्या रूपात पाहिलं. समर्थ म्हणतात... 'आरंभी वंदिन विघ्नविनायक , जया ब्रह्मादिक वंदितील, तेथुनिया विद्या सर्व प्रगटती, ते हे विद्यामूर्ती धरा मनी' ब्रह्मादिदेवांनीही ज्याला वंदन केलं अशा त्यांचाही पूर्वज असलेल्या... 'विद्यामूर्ती' गणेशाचं स्मरण समर्थ करतात. गणपती विघ्नांचा नाश करतो म्हणजे नेमकं काय करतो? त्याच्या केवळ स्मरणानं विघ्न दूर पळतात, की तो प्रत्यक्ष येऊन विघ्नांना दूर पळवतो? विघ्न ही एकाप्रकारे 'अविद्या' आहे. अंधाराला दूर करण्याची अशी कुठलीच प्रक्रिया नाही. प्रकाशाचं येणं हीच अंधाराच्या नाशाची प्रक्रिया! काही काळ समोर मळभ दाटून आलं तर सूर्यकिरण अडतात हे खरं असलं तरी याचा अर्थ सूयार्चं धगधगणं थांबलं असा होत नाही. ढगांच्या मागे तो तेजोनिधी तळपत असतोच. अगदी याचप्रमाणे हे विश्व अखंडपणे ज्ञानस्वरूप आहे. आवश्यकता आहे, अविद्येचं मळभ दूर करण्याची! कोणतंही कार्य हाती घेत असतांना, कायारंभी विद्याधिपती गणपतीचं पूजन केल्यास, अविद्येचं सारं मळभ दूर होतं.

गणेशाच्या स्मरणानं मती प्रकाशमान होते. अशी 'सकलमतिप्रकाशु' या शब्दाचीही मान्यता आहे. विघ्नांशी सामना करण्याचं सामर्थ्य आपल्या ठायी निर्माण होतं. 'तो' बुद्धी-प्रकाशात आल्याने आपण सज्ज होतो. असं म्हणतात, मूकं करोति वाचालं, पंगुं लंघयते गिरिम्... त्याची कृपा झाली तर वाचाहीनाला वाचा फुटते आणि अपंग पर्वतशिखर पार करतो. म्हणूनच त्याने येऊन आपली विघ्नं दूर करावी यासाठी ही प्रार्थना नाहीच! ही प्रार्थना त्याची केवळ कृपा व्हावी यासाठी. ही प्रार्थना स्वतःसाठी. माझ्या मतिप्रकाशात 'तो' अखंड तेजाळत असावा... त्याचं सामर्थ्य मिळावं. मलाच माझा सुखकर्ता होता यावं... दुःखहर्ता होता यावं...!

# शाश्वत जीवनाचा मंत्र म्हणजे गणेशोत्सव!



गणेशोत्सव म्हणजे चैतन्याचा सोहळा! गणरायाच्या आगमनामुळे सध्या सगळीकडे उत्साहाचे वातावरण आपल्याला अनुभवयाला मिळते. एकीकडे पर्यावरणपूरक मखर सजावटीचा विचार काहींनी सुरू केला आहे, तर दुसरीकडे खाद्यपदार्थांची लगबग परंतु, गणेशोत्सवामागचा शास्त्रविचार नेमका काय? आताच्या पिढीसाठी गणेशोत्सवाचे महत्त्व काय? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर, ज्येष्ठ पंचांगकर्ते व खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांची घेतलेली विशेष मुलाखत.

**आजच्या युवकांसाठी गणेशोत्सव म्हणजे नेमके काय?**

गणपतीचे गुण आपल्या अंगी यायला हवे, म्हणून गणेशपूजा करायला हवी. आता हे गुण कोणते, तर गणपती म्हणजे १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती आहे असे आपण म्हणतो. त्यातील एक कला आणि एक विद्या जरी आपण आत्मसात केली, तरी आपले जीवन समृद्ध होईल. गणनायक म्हणजे काय तर, आपल्याला नेतृत्वाचा विचार करता आला पाहिजे. आपण नेतृत्वाचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. गणपती सुखकर्ता आहे दुखहर्ता आहे. आपल्याला आपले जीवन तर सुखी करायचे आहेच परंतु, त्यासोबतच दुर्सयांचे दुःखसुद्धा संपवायचे आहे. प्रत्येक गणेश चतुर्थीर्ला आपण अशा प्रकारे गुण घेतले, आत्मसात केले, तर व्यक्तीचा आणि समाजाचा उत्कर्ष नक्कीच होईल.

**गणेश पूजा नेमकी किती जुनी आहे? कुठल्या प्राचीन ग्रंथांमध्ये आपल्याला गणेश पूजनाचा उल्लेख आढळतो?**

वेदांमध्ये आपल्याला गणेश पूजनाचा उल्लेख आढळतो. प्रामुख्याने अर्थववेदामध्ये आपल्याला गणपतीचा उल्लेख आढळतो. सुमारे तीन ते चार हजार वर्षांपासून, गणपतीची पूजा केली जाते. पृथ्वीविषयक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीसुद्धा बुद्धीच्या या देवतेची पूजा केली जाते. त्याचबरोबर ह्यगणेश पुराणह्ल आणि ह्यमुदगल पुराणह्ल यांचे जर आपण अध्ययन केले, तर आपल्याला याविषयी माहिती मिळते.

**याच अनुषंगाने षोडशोपचार पूजेचे नेमके महत्त्व काय आहे?**

आपल्या घरामध्ये जेव्हा कुणी अतिथी येतात, तेव्हा आपण त्यांचे आदरातिथ्य करतो, त्यांचा मानपान करतो. अगदी त्याचप्रकारे आपल्या घरी ज्यावेळेस गणपती येतो, तेव्हा अशाच पद्धतीचे आपण आदरातिथ्य करतो. आपण गणपतीचे १६ उपचारांनी पूजन करणे अपेक्षित असते. आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवित, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, मंत्रपुष्प, प्रदक्षिणा आणि नमस्कार अशा १६ उपचारांनी जी पूजा केली जाते, तिला ह्यषोडशोपचार पूजाह्ल म्हणतात. गणपतीची पूजा आपण ज्या वेळेस करतो, त्यावेळी आपण त्या मातीच्या मूर्तीमध्ये प्राणप्रतिष्ठेच्या माध्यमातून देवत्व आणत असतो. आणि आपण ज्यावेळेस मूतीर्चे विसर्जन करतो, त्यावेळेस उत्तरपूजा करून देवत्व काढून घेतो. आपण गणपतीचे विसर्जन करत नाही, गणपतीच्या मूतीर्चे विसर्जन करतो.

**काही ठिकाणी दीड दिवसांचा गणपती असतो, कुठे पाच, तर कुठे सात दिवसांचा गणपती असतो, या बाबतीतला शास्त्रविचार काय आहे?**

अगदी प्रामाणिकपणे सांगायचे, तर त्याच दिवशी गणेश मूतीर्चे विसर्जन करायचे असते हा शास्त्रविचार आहे. मात्र, आपण इतकी सुंदर मूर्ती घरामध्ये आणतो, त्या मूतीर्चे प्राणप्रतिष्ठा करतो, त्यानिमित्ताने घरामध्ये आपल्या भोवताली चैतन्यमय वातावरण तयार होते.

आपल्या घराण्यामध्ये पारंपरिकदृष्ट्या जे नियम असेल, त्या अनुषंगाने काही लोक दीड दिवसांचा, कुठे पाच दिवसांचा गणपती ठेवला जातो. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा विचार आपल्याकडे पेरला तो लोकजागृतीसाठी, लोकांना एकत्र आणण्यासाठी! यानिमित्ताने समाजामध्ये विचारांची देवाणघेवाण होणे अत्यंत गरजेचे आहे. दिवसांपेक्षासुद्धा महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपण या उत्सवकाळामध्ये गणपतीचे किती गुण आपल्या अंगी बाणवतो याला जास्त महत्त्व आहे.

**गणेशोत्सवातील महत्त्वाचा भाग म्हणजे आरती. आरत्यांचे महत्त्व काय?**

आर्त स्वरात म्हणायची ती आरती. आरती ओरडून म्हणण्याची नसते. पूजा केल्यानंतर आपण आरती करतो परंतु, ती आरती शुद्ध वाणीने म्हणणे गरजेचे आहे. गणपतीच्या दिवसांमध्ये आरती म्हणायच्या आधी, आपण आरतीचे पुस्तक घेऊन सराव करायला हवा. ती आरती ऐकल्यानंतर आपल्यालासुद्धा प्रसन्न वाटले पाहिजे. आपल्याकडे समर्थ रामदासांपासून अनेकांनी आरतीची रचना केली. त्यामागे भक्तीची एक भूमिका आहे, ते आपण समजून घेतली पाहिजे.

**कधी कधी गणेशोत्सवादरम्यान काही अघटित घटना घडते व काही कुटुंबांना सुतक लागतं, अशावेळी गणेशपूजन करावे का?**

आपल्या कुटुंबामध्ये दैनंदिन जीवनामध्ये कधीकधी अडचणी येत असतात. काही वेळेला गणपती पूजन गणेश उत्सवात करणे शय होत नाही. एखाद्या वर्षी जर सुतक असेल, तर गणेशोत्सव साजरा केला नाही तरी चालेल. काही कारणाने खंड पडला असेल आणि उत्सव पुढच्या वर्षी साजरा करण्याचा विचार असेल, तर भाविक ते करू शकतात. हे करताना कुठल्याही प्रकारे मनात भीती असता कामा नये. माणसाने निर्भयपणे सण आणि उत्सव साजरे करावे आणि त्यास निर्भयपणे जगण्याचा विचारच ही देवता आपल्याला देत असते. गणपती संकट दूर करणारी देवता आहे, त्याच्याकडे प्रार्थना करावी.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आपल्या दृष्टीने महत्त्व काय?**

गणेशोत्सव म्हटले की हल्ली आपल्याला असे दिसून येते की, शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात डीजेचा वापर केला जातो. लेझर लाईट लावल्या जातात. हे अत्यंत चुकीचे आहे आणि मुख्य म्हणजे आपल्या समाजाच्या आरोग्यासाठी हे जास्त घातक आहे. गणेशोत्सवाचा सण हा असा सण आहे, ज्यामुळे माणसांमध्ये चैतन्य निर्माण होते. पूर्वीच्या काळी ज्या साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा केला जात असे, त्यातून निसगार्चा आणि मानवाच्या व्यवहाराचा समतोल राखला जाई. गणेशोत्सवामुळे आपल्याला शाश्वत जीवनाचा मंत्र कळतो, सगुणाची भक्ती, निसगार्चा सहवास या संगमातून आपलं जीवन आणखी समृद्ध होते. यामुळे ज्या ज्या प्रकारे शय होईल, त्या त्या पद्धतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करायला हवा. अनेक ठिकाणी फुलांची आरास केली जाते, नैसर्गिक रंगांचा वापर केला जातो. अशाच वेगवेगळ्या प्रकारे आपण आपला उत्सव पर्यावरणपूरक करायला हवा.

**गौरी-गणपतीमध्ये गौरीचे आणि गणपतीचे नाते नेमके काय आहे?** काही ठिकाणी गौराईला आई न मानता गणपतीची बहीण, तर काही ठिकाणी बायको म्हणून पूजले जाते, तर याबद्दलचे शास्त्राच्या अनुषंगाने वास्तव सांगा.

अनुराधा नक्षत्र असताना, गौरीचे आगमन होते. या वर्षी दि. ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.२५ मिनिटांपर्यंत अनुराधा नक्षत्र आहे, तोपर्यंत गौरी आणावी. गौरी म्हणजे पार्वती, गणपतीची माता. कोल्हासूर राक्षसाचा वध करणारी महालक्ष्मी माता ती ही गौरी. ज्येष्ठ नक्षत्रावर तिचे पूजन केले जाते. यावर्षी दि. १ सप्टेंबर रोजी गौरीपूजन आहे. गौरीचे विसर्जन मूळ नक्षत्रावर केले जाते. यावर्षी दि. २ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जन आहे. रात्री ९.५० वाजेपर्यंत गौरी विसर्जन करायचे आहे. काही ठिकाणी तेरड्याच्या गौरी आणतात, तर काही ठिकाणी खड्याच्या गौरी आणतात, काही ठिकाणी मुखवट्याच्या गौरीही केल्या जातात, तर काही ठिकाणी गौरीची मूतीर्सुद्धा असते. घराण्यामध्ये गौरी पूजनाची जशी परंपरा असेल, त्या प्रकारे ही पूजा होते. गौरीचा हा सण माहेरवाशिणींचा सण असून, महिलांसाठी विशेष असतो. काही ठिकाणी ६४ भाज्यांचा नैवेद्य गौरीला दाखवला जातो. माहेरी मुलीचे कौतुक केले जाते, वातावरणामध्ये एक प्रकारचा आनंद असतो.

**गणेशोत्सव आता केवळ भारतापुरता मर्यादित नसून, सातासमुद्रापार साजरा केला जातो. परदेशस्थ भारतीयसुद्धा भक्तिभावाने गणेशपूजन करतात. संस्कृतीच्या या प्रसाराबद्दल काय सांगाल?**

नेपाळ, तिबेट, ब्रह्मदेश, थायलंड, चांपा, इंडोनेशिया, जावा, बाली, बोरनियो, चीन, तुर्कस्तान, जपान, मेसिको आदी देशांमध्ये, गणपतीची पूजा केली जाते. गणपतीची अनेक मंदिरेसुद्धा या देशांमध्ये आहे. जगाच्या पाठीवर जिथे जिथे भारतीय माणूस गेला आहे, तिथे तिथे तो गणेशोत्सव साजरा करतो. हा गणेशोत्सव इतया उत्साहात साजरा होतो कारण, त्या विचारांमागच्या भक्तीचा कार्यकारणभाव परदेशी माणसं लक्षात घेतात आणि आपल्या संस्कृतीशी एकरूप होतात. त्यामुळे आपण आपल्या उत्सावामागचा शाश्वत विचार लोकांपर्यंत पोहोचवायला हवा.

# गणेश चतुर्थी

**सर्व देवतांमध्ये श्री गणेश याला पूजेचा पहिला मान दिला जातो. सर्व प्रकारच्या शुभकार्यात सर्वप्रथम गणपतीचे पूजन केले जाते. शिवपार्वतीचा पुत्र गणपती विद्येचे दैवत मानले जाते. गणेश चतुर्थी हा उत्सव महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश तसेच संपूर्ण भारत व विदेशातही साजरा केला जातो.ज्या दिवशी शंकराने गणपतीला हत्तीचे तोंड लावून त्याला जिवंत केले. त्या दिवशी गणेश उत्सव साजरा केला जातो. त्या दिवसाला गणेशचतुर्थी असे म्हटले जाते. त्यानंतर ११ दिवस चालणारा हा उत्सव अतिशय आनंदाने व उत्साहाने पार पाडला जातो व हा उत्सव अनंत चतुर्थीला गणपतीच्या विसर्जनाने संपतो.**



आपल्या लाडक्या बाप्पाचा सण आला आहे. गणांवर प्रभुत्व असलेल्या श्री गणेशाची सर्व प्रथम पूजा केली जाते. कोणतेही नवीन कार्य सुरू करण्यापूर्वी श्रीगणेशाची पूजा केली जाते आणि त्यानंतर इतर देवी-देवतांची पूजा केली जाते. आणि कोणत्याही मंगल शुभ विधीपूर्वी भगवान गणेशाची पूजा केली जाते कारण बाप्पाला सर्व संकटे दूर करणारा विघ्नहर्ता म्हणतात. लोक कल्याण करणे हे बाप्पाचे उद्दिष्ट आहे.

बाप्पा सर्व कार्यांना निर्विघ्नपणे पूर्ण करण्याचं कार्य करतात. रिद्धी-सिद्धीचा स्वामी गणेश आहे. आणि त्याच्या कृपेने संपत्ती आणि समृद्धीची कधीही कमतरता होत नाही. आणि यावर्षी गणेश चतुर्थीचा उत्सव भाद्रपद चतुर्थी १९ सप्टेंबर रोजी होईल, जिथे गणपतीची स्थापना केली जाईल. शेतकरी गणपतीची पूजा केली जाते आणि हा उत्सव ११ दिवस चालतो. घरोघरी आणि मंडपोमंडपी येणारा हा बाप्पा येतांना सर्वत्र आनंदाचे उत्साहाचे वातावरण घेउन येतो.

त्याच्या आगमनापुर्वीपासुनच कितीतरी दिवस आधीपासुन तयारी सुरू होते. प्रत्येक जण आपल्या पंरपरेप्रमाणे त्याची पुजा अर्चना करतात.कुठे बाप्पा संपुर्ण दहा दिवस, कुठे पाच दिवस, कुठे दिड दिवस तर कुठे अगदी एक दिवसाकरीता देखील येतो.

ज्योतिषशास्त्रात देव, मानव आणि दानव या तीन गणांचे वर्णन आहे. देवलोक, भूलोक आणि दानलोकात गणपती पूजनीय आहे. गणपती ब्रह्मस्वरूपात असून त्यांच्या पोटात सर्व काही सामावलेले आहे. आणि हे तिन्ही जग त्याच्या पोटात सामावलेले असल्यामुळे त्याला लंबोदर म्हणतात आणि गणपतीमध्ये सर्वकाही पचवण्याची क्षमता आहे. लंबोदर असणे म्हणजे त्यांच्या पोटात जे जाते ते तिथून बाहेर पडत नाही. गणपती हे लंबोदर म्हणवले जाते.

### गणेशाची कथा -

एकदा माता पार्वतीला स्नानासाठी जायचे असतांना बाहेर कुणी पहारेकरी नसल्याने तिने मातीची एक मुर्ती बनवुन त्यात प्राण फुंकले त्याला पहारेकरी नेमुन ती स्नानाला गेली असता बाहेर भगवान शंकर आले.

त्यांना बाळ पहारेकऱ्याने रोखले आणि महालात प्रवेश देण्यास मनाई केली. भगवान शंकर आणि बाळ गणेशामध्ये युद्ध सुरु झाले. आणि त्यात भगवान शंकराने बाळ गणेशाचे संतापून शिरविच्छेद केले.

माता पार्वती स्नानाहुन आल्यानंतर झालेल्या प्रकाराने प्रचंड संतापल्या आणि क्रोधीत झाल्या त्याने शंकराला बाळ गणेशाला पुन्हा जिवंत करण्याचे सांगितले. माता पार्वतीचा क्रोध शांत करण्यासाठी भगवान शंकराने आपल्या सेवकांना प्रथम जे कोणी दिसेल त्याचे शिर आणावयास सांगितले सेवक हत्तीच्या बाळाचे शिर घेउन आले असता ते शिर त्या धडावर बसविण्यात आले. तो दिवस भाद्रपद महिन्यातला शुध्द चतुर्थीचा दिवस होता आणि तेंव्हापासुन श्री गणेशाचा उत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू झाली.भगवान गणेशाला दुर्वा प्रिय असल्याने त्यांच्या शिरावर दुर्वा वाहाण्याची प्रथा आहे.त्याचप्रमाणे त्यांना मोदक आवडत असल्याने गणेशाला मोदकांचा नैवेद्य दिला जातो.

### गणेश महोत्सवाचा इतिहास-

गणेश चतुर्थीच्या उत्सवाची पूजा केव्हा सुरू झाली याची नेमकी तारीख कोणालाच माहीत नाही, तथापि इतिहासानुसार, गणेश चतुर्थी हा सार्वजनिक उत्सव म्हणून छत्रपती शिवाजी (मराठा साम्राज्याचे संस्थापक) यांच्या काळात १६३०-१६८० मध्ये सुरू झाल्याचा अंदाज आहे.पुढे छत्रपती शिवरायांनी पुण्यात हा उत्सव सुरू केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी हा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला. या महोत्सवातून त्यांनी लोकांमध्ये जनजागृती केली. यानंतर पेशव्यांनीही गणपती महोत्सवाचा क्रम पुढे नेला. गणपती हे त्यांचे कुलदैवत होते, त्यामुळे तेही मोठ्या उत्साहाने गणेशाची पूजा करायचे. पेशवाईच्या समाप्तीनंतर, हा एक कौटुंबिक उत्सव राहिला, तो १८९३ मध्ये बाळ गंगाधर लोकमान्य टिळक (एक भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि समाजसुधारक) यांनी पुनरुज्जीवित केला

त्यांनी श्री गणेशजींना लोकांचे देव असे संबोधले. लोकांनी ते मोठ्या उत्साहाने स्वीकारले, त्यानंतर गणेशोत्सव हे जनआंदोलनाचे माध्यम बनले. त्यांनी या उत्सवाला लोकांशी जोडून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जनजागरण करण्याचे माध्यम बनवले आणि त्यात ते यशस्वीही झाले. आजही संपूर्ण महाराष्ट्र हा या उत्सवाचा केंद्रबिंदू आहे आणि हा उत्सव लोकांना जोडतो.या उद्धेशाने हा सण सुरु करण्यात आला. गणपती उत्सव माणसांना एका धाग्यात जोडतो.

या काळात रोज सकाळी व संध्याकाळी त्याच्यापुढे आरती म्हटली जाते. मोदकाचा प्रसाद दिला जातो. अकरा दिवसांनी म्हणजे अनंत चतुर्थीला मूर्तीचे नदीत किंवा तलावात विसर्जन केले जाते. १८९२ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी हा गणेशोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करायला सुरवात केली.

पारतंत्र्याचा काळ असल्याने लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात जागृती निर्माण व्हवी हा हेतु त्यामागे होता. सरदार खाजगीवाले यांनी सर्वात प्रथम गणेशोत्सव ग्वाल्हेरला साजरा केला. गणपत घोवडेकर, भाऊ वैद्य, भाऊ रंगारी यांनी गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठपना करुन हा उत्सव साजरा केला.

हे पाहून टिळक यांनी पुण्यात केसरीवाड्यात सार्वजनिक स्वरुपात गणेशोत्सवाची सुरुवात केली. गणेश चतुर्थीला गणपतीची प्रतिष्ठापना केल्यानंतर काही लोक दीड दिवसांनी, काही पाच, सात किंवा अकराव्या दिवशी गणपतीचे विसर्जन करतात.

### गणेशोत्सवाचे महत्त्व-

भाद्रपद चतुर्थीच्या दिवशी गणपती महाराजांच्या स्थापनेपासून ते चतुर्दशीच्या विसर्जनापर्यंत, गणपती जी विविध रूपात संपूर्ण देशात विराजमान असतात. त्याला मोदक तर आवडतातच, पण तो गणपती अकिंचनचाही आदर करतो, म्हणून त्याला दुर्वा आणि नैवेद्यही तितकेच प्रिय आहेत. या सणामुळे किती तरी हातांना रोजगार मिळतो.

सर्वांना सोबत घेऊन जाणारे आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचेही दर्शन या सणातून होते. सामाजिक एकोपा वाढवुन चांगल्या विचारांची देवाण घेवाण करणे, गरजवंताना सहाय्य करणे, विविध स्पर्धांचे आयोजन करून लोकांमधील चांगल्या गुणांचा प्रचार होण्यासाठी गंणेशोत्सव साजरा केला जातो.

महाराष्ट्रातील मुंबईत या गणेशोत्सवाला एक आगळे वेगळे महत्त्व आहे. इथे गणपतीच्या मोठ्या मोठ्या मुर्त्या बसवतात. सार्वजनिक मंडळे या काळात आकर्षक देखावे उभारतात.यात ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक देखावे असतात.मुंबईतील लालबागाच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी लांबवरून लोक येतात. हा नवसाला पावणारा गणपती आहे.

### गणपतीची मूर्ती निवडताना हे नियम लक्षात ठेवा-

मूर्ती शक्यतो बसलेली असावी एक ते दीड फुटांपेक्षा जास्त मोठी मूर्ती नसावी.

एकदंत, चतुर्भुज, पाश आणि अंकुश धारण करणारा.

मुर्तीचे हात, पाय, डोळे, कान सुबक असावे.

चित्रविचित्र आकारातील गणपती मुळीच घेऊ नये.

गणेशाची मूर्ती सुंदर, मोहक आणि सुबक असावी.

अनंत चतुर्दशी च्या दिवशी वाजत गाजत मिरवणूक काढून गणपतींच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते.

## गणेश चतुर्थी मुहूर्त

पंचांगानुसार, भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी २६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १:५४ वाजता सुरू होईल आणि २७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३:४४ पर्यंत चालेल. उगवता सूर्य तारखेनुसार, गणेश चतुर्थीचा उत्सव २७ ऑगस्ट २०२५ (बुधवार) रोजी साजरा केला जाईल.

गणेश पूजेचा शुभ काळ (मध्याह्न मुहूर्त)

गणपतीची स्थापना आणि पूजेसाठी सर्वोत्तम काळ

सकाळी ११:०५ ते दुपारी १:४० (२७ ऑगस्ट २०२५) या काळात पूजा केल्याने खूप शुभ परिणाम मिळतात.

गणेश चतुर्थीला आपण चंद्र दर्शन का टाळावे?

धार्मिक श्रद्धेनुसार, गणेश चतुर्थीला चंद्र पाहून खोटे आरोप किंवा बदनामी होण्याचा धोका असतो. म्हणून, आपण या काळात चंद्र दर्शन टाळावे:

२६ ऑगस्ट २०२५: दुपारी १:५४ ते रात्री ८:२९

२७ ऑगस्ट २०२५: सकाळी ९:२८ ते रात्री ८:५७

## गणेश चतुर्थी साजरी कशी करतात?

उत्सवाच्या सुरुवातीला घरात सुंदर सजावट केली जाते. गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. उपासना करण्याच्या १६ पद्धती आहेत. मूर्तीला लाल चंदन लावले जाते आणि पिवळ्या व लाल फुलांनी सजवले जाते. गणरायाला जास्वंदाचे फूल आणि दूर्वा अत्यंत प्रिय आहेत, त्या अर्पण केल्या जातात. तसेच गणेश उपनिषद आणि इतर वैदिक स्तोत्रांचा उच्चार केला जातो.

त्याशिवाय नारळ, गूळ आणि २१ मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. मोदक हा गणेश यांचा आवडता पदार्थ मानला जातो. उत्सवाच्या शेवटी ढोल वाजवून, भक्तीने गायन आणि नृत्यासह मूर्तींच्या मोठ्या मिरवणुका जवळच्या नदीकडे नेल्या जातात. विधीचा एक भाग म्हणून मूर्तीचे विसर्जन केले जाते. गणेश आपले आई-वडील म्हणजेच शिव आणि पार्वतीचे घर असलेल्या कैलास पर्वतावर परत जातात, असे मानले जाते.

गणेश चतुर्थी हा केवळ भगवान गणेशाच्या जन्माचा उत्सव नाही तर तो नवीन सुरुवात, ज्ञान, सौभाग्य आणि अडथळ्यांपासून मुक्ततेचा संदेश देखील देतो. योग्य पद्धतीने पूजा केल्यास बाप्पाच्या कृपेने जीवनात आनंद, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा संचारते.

गणपती बाप्पांची आवड विचारल्यास प्रत्येकाला माहित आहे की प्रसादाच्या रूपात बाप्पाला मोदक अत्यंत प्रिय आहेत. बाप्पांचं मोदक प्रेम यावरुन देखील दिसून येतं की त्यांच्या प्रत्येक फोटो किंवा मूर्तीमध्ये त्यांच्या हातात मोदक नक्की दिसून येतं. तर काही मूर्तीमध्ये बाप्पाचं वाहन असलेला मूषकही मोदक खाताना बघायला मिळतो.

मोदक प्रिय असल्यामागे गोष्ट अशी आहे की १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असलेल्या गणपतीशी परशुरामाने युद्ध पुकारले. या युद्धात गणरायाचा एक दात तुटला होता. त्यामुळे बाप्पाला एकदंत असं संबोधलं जातं. दात तुटल्याने बाप्पाला काहीही खाणे त्रासदायक होत असताना लाडक्या गणरायासाठी एक खास पदार्थ तयार करण्यात आला. हा अतिशय स्वादिष्ट पदार्थ होता 'मोदक'. मोदक सहजपणे तोंडात मिसळून जातं, हा पदार्थ खाताना त्रास होत नाही तर पदार्थाची गोडी वेगळीच चव देते. त्यामुळे गणपतीला मोदक अधिक पसंत असल्याचे मानले जाते.

### मोदक म्हणजे आनंद...

'मोद' म्हणजे आनंद देणारे. मोदक खाल्ल्याने मन प्रसन्न होतं. गणपती बाप्पा नेहमी आनंदी राहणारा देव आहे. तसंच मोदक शूद्ध पीट, तूप, मैदा, खवा, गूळ आणि नारळापासून तयार केला जातो. यामुळे मोदक आरोग्यासाठीही गुणकारी असल्याचे मानलं जातं.

या पदार्थाला अमृततुल्य मानलं जातं. पुराणानुसार देवतांनी अमृतापासून तयार करण्यात आलेला एक मोदक पार्वती देवीला भेट दिला होता. गणपती बाप्पांना जेव्हा माता पार्वतीकडून मोदकांचे गुण माहित पडले तेव्हा त्यांची मोदक खाण्याची तीव्र इच्छा झाली. गणपती बाप्पांनी ते मोदक खाल्ले. मोदक खाल्ल्यावर गणेशाला अपार संतुष्टी मिळाली. तेव्हापासून गणेपतीला मोदक अधिक प्रिय आहेत.



## गणेश चतुर्थीचे महत्त्व

पौराणिक मान्यतेनुसार, ज्या दिवशी महादेव शंकर आणि माता पार्वतीचा मुलगा गणेश जन्माला आले, तो दिवस म्हणजे भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाची चतुर्थी होती. म्हणून या दिवसाला गणेश चतुर्थी आणि विनायक चतुर्थी म्हणून ओळखले जाते. श्रीगणेशाच्या पूजेमुळे घरात सुख, समृद्धी आणि भरभराट होते, असे मानले जाते. कोणत्याही शुभकार्यात विघ्न येऊ नये म्हणून गणेशाची आराधना करतात.शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीपासून हा उत्सव ऐतिहासिकदृष्ट्या साजरा केला जातो. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक उत्सवाला सुरुवात केली; ज्यामुळे भारताच्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान समाजातील सर्व जातींच्या लोकांमध्ये एकता निर्माण झाली.

या सणाला खूप सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व आहे. कारण- भारतातील आणि त्यापलीकडे भक्तगण भगवान गणेशाची पूजा करण्यासाठी, यशासाठी आणि अडथळे दूर करण्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी एकत्र येतात. असे म्हटले जाते, जे लोक गणेशाची पूजा करतात, ते त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि ध्येये पूर्ण करण्यास सक्षम असतात. गणरायाची मनोभावे पूजा करणाऱ्यांची इच्छा पूर्ण होते आणि जे कोणी त्याची प्रार्थना करतात, त्यांची पापांची मुक्तता होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

# गणेशोत्सवादरम्यान कोकणवासियांसाठी महामार्गावर विशेष वाहतूक नियोजन - पोलिस, एसटी व प्रशासन सज्ज



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. कोकणातील गणेशोत्सव शांततेत, सुरळीत आणि विनाअपघाती व्हावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहनांची वर्दळ नियंत्रीत करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असून, नागरिकांनी देखील प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अपर पोलिस महासंचालक (वाहतुक) प्रविण साळुंके यांनी केले आहे. गणेशोत्सव काळात गणेश भक्तांना त्यांच्या गावी वेळेत पोहचता यावे व गणेशोत्सवा दरम्यान वाहतुक कोंडी न होता हा सण निर्विघ्नपणे पार पाडावा यासाठी आज नवीमुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये गणेशोत्सव २०२५ निमित्त समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस रायगड पोलीस अधिक्षक (महामार्ग) तानाजी चिखले, नवी मुंबई पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, आय.आर.बी, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, आरोग्य विभाग या विभागातील अधिकारी तसेच कोकण विभागातील पोलीस अधिक्षक, अपर पोलीस अधिक्षक, सहायक पोलीस अधिक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पुणे विभागाचे महामार्ग पोलीस अधिक्षक उपस्थित होते. २७ ऑगस्ट पासून सुरु होत असलेल्या गणेशोत्सव काळात राज्याच्या विविध ठिकाणांहून चाकरमनी कोकणात आपल्या गावी मोठया संख्येने जातात. गणेशोत्सवादरम्यान येणाऱ्या शासकीय सुट्ट्यांमुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहतुक कोंडी लक्षात घेता पोलीस प्रशासनामार्फत वाहतुकीचे विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) श्री. साळुंके यांनी दिली. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ अंतर्गत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गणेशोत्सव काळात वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी डेल्टा फोर्स व पेट्रोलिंग वाहनांची गस्त वाढविण्यात आली आहे. वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्याठिकाणी सुचना फलक, रंबलर स्ट्रीप, गतीरोधक फलक, वाहतुक नियंत्रण सुचना फलक आदि लावण्यात आले आहेत. घाट क्षेत्रातील दरड कोसळणाऱ्या ठिकाणी लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या आहेत. महामार्ग क्र. ४८ वर किरकोळ दुरुस्ती अंतर्गत खड्डे बुजविणे, बाजूपट्ट्या दुरुस्त करणे, लेन मार्किंग करणे, माहिती फलक स्वच्छ करणे इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत. बोर घाटात अपघात कालीन परिस्थिती उद्भवल्यास एकूण ४ ठिकाणी वाहतुक नियंत्रण व नियोजन करण्यासाठी घाट निरिक्षक प्रतिसाद पथक २४ तास तैनात करण्यात आले आहे.

# बेकायदा बांधकामांना आळा न घातल्यास अराजकता, हायकोर्टाकडून ठाण्यातील प्रकरणी चिंता व्यक्त

**■मुंबई। प्रतिनिधी :**




वेगाने वाढणाऱ्या शहरांतील वाढत्या बेकायदा बांधकामांना आळा घालण्यासाठी कठोर दृष्टिकोन नसेल तर पुढील पिढ्यांना अराजकता आणि संकटाचा सामना करावा लागेल, असा गंभीर इशारा उच्च न्यायालयाने सोमवारी दिला, तसेच राज्यातील अनेक महापालिकांच्या अधिकार क्षेत्रातून बेकायदा बांधकामांविरोधात दाखल झालेल्या याचिकांचे प्रमाण पाहता नगर विकास विभाग बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही, असेही न्यायालयाने सुनावले. न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. मंजूषा देशपांडे यांनी ठाण्याच्या वर्तकनगरमधील बेकायदा बांधकामाविरोधात केलेल्या याचिकेवर सुनावणी घेताना राज्याच्या नगरविकास विभागालाही काही सूचना केल्या. बेकायदा बांधकामांच्या वाढत्या तक्रारी पाहता नगरविकास विभागाने बेकायदा बांधकामांचा प्रश्न हाताळण्यासाठी एक व्यापक आणि ठोस धोरण आखून त्याची अंमलबजावणी करावी, अशी सूचना खंडपीठाने सुनावणीदरम्यान केली.

**खंडपीठ काय म्हणाले?**

पालिका अधिकाऱ्यांनी दक्ष असणे आवश्यक आहे. जेणेकरून नवीन अनधिकृत बांधकामे उभी राहणार नाहीत ठाण्याला एक आदर्श शहर बनविण्याचा पालिका आयुक्तांचा उद्देश आहे. जिथे कोणतेही अनधिकृत बांधकाम नसेल. सर्व महापालिकांच्या आयुक्तांनी कायदेशीर पावले उचलून बेकायदा बांधकामांचा बंदोबस्त करणे अत्यावश्यक आहे. अधिकाऱ्यांनी कायदेविषयक अटींचे पालन न केल्यास बांधकाम आणि विकासाच्या बाबतीत कायद्याचे राज्यच राहणार नाही. संबंधित इमारतीवर कारवाई करण्याचे काम सुरू असल्याची माहिती ठाणे महापालिकेतर्फे न्यायालयाला देण्यात आली. पालिकेच्या एका अधिकाऱ्यामुळे इमारतीवर कारवाई करण्यास विलंब झाल्याचेही महापालिकेने यावेळी मान्य केले.

# मरीन ड्राईव्हच्या समुद्रात आढळला तरुणीचा मृतदेह



**■मुंबई। प्रतिनिधी :**

लोकांची नेहमी वर्दळ असणाऱ्या मरीन ड्राईव्हवरील नरिमन पॉइंटजवळ एका तरुणीचा मृतदेह समुद्रात एका तरुणीचा मृतदेह आढळून आला. २४ वर्षीय तरुणीचा मृतदेह पोलिसांनी बाहेर काढला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. तरुणीच्या चेहऱ्यावर जखमाही आढळून आल्या आहेत. नरिमन पॉईंटजवळ सोमवारी एका २४ वर्षीय तरुणीचा मृतदेह समुद्रात आढळून आला. माहिती मिळताच कफ परेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तरुणीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. तरुणीने काळा टी शर्ट घातलेला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणीचे नाव मनिता गुप्ता असं आहे. तिच्या चेहऱ्यावर जखम असल्याचे आढळून आले आहे. २४ वर्षीय मनिता गुप्ता रविवारपासून (२४ ऑगस्ट) बेपत्ता होती. कफ परेड पोलीस ठाण्यात तशी तक्रार दाखल करण्यात आली होती. तिचा शोध घेणे सुरू असतानाच मृतदेह सापडला.

मनिता गुप्ताने आत्महत्या केली की, तिच्यासोबत काही घातपात झाला, असे प्रश्न तिचा मृतदेह मिळाल्यानंतर उपस्थित होत आहे. पोलिसांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मनिताच्या मृत्यूबद्दल काही गोष्टी समोर येतील असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# पुण्यात गणेशोत्सवात मद्यविक्री बंद!

**■पुणे। प्रतिनिधी:**

शहरातील खडक, विश्रामबाग आणि फरासखाना या मध्यवर्ती भागातील पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गणेश चतुर्थीपासून अर्थात २७ ऑगस्ट ते अनंत चतुर्दशीपर्यंत म्हणजेच ७ सप्टेंबर या काळात ११ दिवस संपूर्ण मद्यविक्रीवर बंदी असणार आहे. त्याचप्रमाणे, संपूर्ण जिल्ह्यात गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत. मध्यवर्ती भागात अनेक मानाचे आणि प्रमुख गणपती मंडळे आहेत. या मंडळांचे देखावे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गणेशभक्तांची गर्दी होते. कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. बुधवारी (दि. २७) श्री गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे, तर ७ सप्टेंबर रोजी विसर्जन होणार आहे. या दोन्ही दिवशी संपूर्ण जिल्ह्यात मद्यविक्रीवर बंदी असेल. तसेच, ७ सप्टेंबर रोजी महापालिका हद्दीतील सर्व दारूची दुकाने बंद राहणार आहेत. ज्या भागात ५ व्या आणि ७ व्या दिवशी विसर्जन मिरवणुका काढल्या जातात, त्या दिवशी संबंधित भागातील मद्यविक्री बंद ठेवली जाईल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दारूबंदी कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# नदीत सापडलेल्या सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह



**■लातूर। प्रतिनिधी:**

चाकूर तालुक्यातून वाहणाऱ्या तिरू नदीच्या पात्रात सापडलेल्या सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ माजली. रविवारी सायंकाळी ही घटना समोर आली. सुटकेसमधील मृतदेह २५-३० वयोगटातील महिलेचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. शेळगाव शिवारात ही घटना घडली आहे. तिरू नदीवर चाकूर आणि वाढवणाला जोडणारा पूल आहे. रविवारी (२४ ऑगस्ट) चार वाजेच्या सुमारास परिसरात दुर्गंधीचा उग्र वास येऊ लागला. शेतकऱ्यांनी याची माहिती पोलीस ठाण्यात कळवली.

वाढवणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, चाकूरचे पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्यासह पोलिसांचे पथक परिसरात आले. त्यांनी वास येत असलेल्या परिसरात झाडाझडती घेतली, तेव्हा नदीकाठावर एक सुटकेस दिसली. त्यानंतर सुटकेस उघडण्यात आली, असता त्यात एका महिलेचा मृतदेह असल्याचे आढळून आले. हे दृश्य बघून सगळेच हादरले. त्यानंतर जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह आणखी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. महिलेचा मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी शवविच्छेदनासाठी चापोली येथील आरोग्य केंद्रात पाठवला. सुटकेसमध्ये आढळून आलेल्या महिलेचे वय २५ ते ३० वर्ष दरम्यान आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. ही महिला कोण आणि तिचा खून का करण्यात आला? याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. नदीवर असलेल्या पुलावरूनच महिलेचा मृतदेह असलेली सुटकेस फेकून दिली गेली, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला.

# गणेशोत्सवासाठी पोलीस सज्ज; सर्वत्र चोख बंदोबस्त तैनात



**■मुंबई। प्रतिनिधी :**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणेशाचे आगमन बुधवारी (27 ऑगस्ट) होत असल्याने गणेशोत्सवासाठी मुंबई पोलीस सज्ज झाले आहेत. संपूर्ण शहरात मुंबई पोलिसांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. मुंबईकराच्या उत्साहाला कुठेही गालबोट लागू नये म्हणून पोलिसांनी योग्य ती खबरदारी घेतली आहे. 36 पोलीस उपायुक्तासह 51 सहाय्यक पोलीस आयुक्त, 2637 पोलीस अधिकारी आणि 14 हजार 430 पोलीस कर्मचार्यासह एसआरपीएफ, क्यूआरटी पथक, दंगल नियंत्रण पथक, वाहतूक पोलीस, डेल्टा, कॉम्बॅट, होमगार्ड आदींना बंदोबस्ताकामी तैनात करण्यात आला आहे. संभाव्य घातपाताच्या पार्श्वभूमीच सर्वच पोलीस ठाण्यांना सतर्कचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र गणेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्सावात साजरा केला जातो. 27 ऑगस्टला गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून 6 सप्टेंबरला अनंत चतुर्थी आहे. मुंबई पोलिसांनी गणेशोत्सव जल्लोषात साजरा करताना शांतता आणि सतर्क राहण्याचे आवाहन सर्वच गणेश मंडळाना केले आहेत. या दरम्यान पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, शहरात कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुंबई पोलिसांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. या काळात मुंबई पोलिसांनी शहरात जास्तीत जास्त पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला आहे. मुंबई पोलिसांच्या मदतीला अतिरिक्त आरपीएफ प्लाटून, एसआरपीएफ प्लाटून, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, होमगार्डसह वाहतूक पोलीस, बीडीडीएस, परिमंडळीय पोलीस अधिकारी, अंमलदार आदींच्या मदतीने बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्यासह इतर सहपोलीस आयुक्त, अतिरिक्त पोलीस आयुक्त, 36 पोलीस उपायुक्तासह 51 सहाय्यक पोलीस आयुक्त, 2637 पोलीस अधिकारी आणि 14 हजार 430 पोलीस कर्मचार्यांना बंदोबस्ताकामी तैनात करण्यात आले आहे. संपूर्ण मुंबई शहरात पाच ते सहा हजाराहून सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्याच्या मदतीने लक्ष ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक पोलीस ठाण्याकडून गणपती मंडळाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात बंदोबस्त लावण्यात आला आहे. बंदोबस्तासाठी स्वयंसेवक, एनसीसी, तटरक्षक स्वयंसेवी संस्थाचा वापर करण्यात येणार आहे. स्थानिक पोलिसांसह एटीएसला संभाव्य घातपात होऊ नये म्हणून सतर्क राहण्यास सांगण्यत आले आहे. तसेच जलद प्रतिसाद पथकाला (क्यूआरटी) सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आहे. गणेशोत्सवासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परिसरात जास्तीत जास्त नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशन करण्याचे आदेश दिले आहे. गणेशोत्सावात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याची पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे. या कालावधीत सर्व पोलिसांच्या सुट्या रद्द करण्यात आले आहे. गर्दीच्या ठिकाणी काही आक्षेपार्ह किंवा बेवारस वस्तू दिसल्यास त्याला हात लावू नये, त्याची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यांना द्यावी. गर्दीचा फायदा घेऊन छेडछाडीचे प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी विशेष काळजी घेतली आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या दादर ते भायखळा तसेच लोअर परेल, प्रभादेवी, ग्रँटरोड, चनीरोड स्थानिक अतिरिक्त रेल्वे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. लोकल प्रवासात हुज्जडवाडी करणे, स्टंट करणार्यांवर रेल्वे पोलिसांनी विशेष नजर असणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे, निहे गृपग्रामपंचायत निहेगाव,नागझरी(बोईसर) तालुका व पंचायत समिती, जिल्हा परिषद पालघर, जि. पालघर येथील १) सौ.रुपाली गणेश संखे राहणारः सदनिका क्रं. ए ३०१, तारांगण को.ऑ.हौ.सो.लि.,फेज २,विरार (पूर्व), ता.वसई,जि.पालघर,४०१४०२, यांच्या मालकीची खालील परिशिष्टात नमूद केलेली गवती जमीन आमच्या अशिलांनी १) श्री. दिपक मोरेश्वर नाईक व २) सौ. प्रिती दिपक नाईक राहणारः गुरुप्रसाद बंगला , जुना गोल्डन नेस्ट फेज ३, रो हाऊस नं . ३, क्वीन मेरी शाळेजवळ , मीरा भाईंदर रोड, मीरा रोड,ता. जी. ठाणे , ४०११०७, हे दोन्ही इसम खरेदी करण्यास ईच्छुक आहेत.

मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

परिशिष्ट

| गाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|
| निहे | ८३ | १२ | ४७.९६२ (सुमारे ४७ गुंठे) |

सदर मिळकती संदर्भात विक्रीचा व्यवहार लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचाही खरेदी - विक्री, साठेकरार, फरोक्तखत, गहाण कब्जा, पोटगी, दान, बक्षिस, तारण, लिज, लिन, अदलाबदल, इजमेंट व अन्य कोणत्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारास खरेदीदाराचे वकील म्हणून त्याच्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत नोंदवाव्यात मुदतीत कोणत्याही हरकती न आल्यास कोणाच्याही कोणत्याही हरकती नाहीत असे समजून माझे अशील प्रस्तुतचा खरेदीव्यवहार पूर्ण झाला आहे असे समजले जाईल. व मुदतीनंतर येणा-या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०८/२०२५

सही/-
ॲड. संजित ताराकांत मिश्रा.
(मो. ८६९२०११११०)
खरेदीदाराचे वकील

कार्यालय :
शॉप नं. १४, सोनाग गंगा को.ऑ.हौ.लि.
गोल्डन नेस्ट बस स्टॉपजवळ, मिरा भाईंदर रोड
मिरा रोड (पुर्व) जि. ठाणे ४०१ १०७


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com